# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## आजपर्यंत विद्यापीठांनी संयुक्त कृषि संशोधन व
## विकास समितीव्दारे संशोधन शिफारशी केलेले पिकनिहाय तंत्रज्ञान

| **पीक व वाण** | : | **केळी** |
|---|---|---|
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०११** |
| पाणी व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | कोकण विभागातील जांभ्या जमिनीवर केळी (ग्रँड नैन) च्या अधिक फायदेशिर मिळकतीसाठी १.७५ मी. × १.७५ मी. अंतरावर लागवड करुन बाष्पपात्राच्या ६० टक्के पाणी म्हणजेच ७ ते ११ लि/झाड/दिवस हे सप्टेंबर ते जून महिन्यांसाठी देऊन शिफारसीत मात्रेच्या १२० टक्के विद्राव्य खताचा वापर दहा समान हप्त्यांमध्ये विभागून देण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१२** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | कोकण विभागातील जांभ्या जमिनीवर सुपारीच्या लागवडीपासून अतिरिक्त फायदा मिळविण्यासाठी सुरुवातीच्या ३ वर्षाच्या काळात आंतर पीक म्हणून केळी (ग्रॅण्ड नैन) पिकाची लागवड ठिबक सिंचन पध्दत वापरुन प्रत्येक झाडाला १० ते १२ लिटर पाणी प्रति दिन नोव्हेंबर ते जानेवारी आणि १५ ते १८ लिटर पाणी प्रति दिन फेब्रुवारी ते मे महिन्यात द्यावे अशी शिफारस करण्यात येत आहे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१३** |
| पाणी व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | कोकण विभागातील जांभ्या जमिनीत केळी (ग्रँड नैन) या पिकापासून अधिक उत्पादन आणि नफा मिळण्यासाठी सुक्ष्म फवारा सिंचन पध्दतीने एक दिवसाआड ऑक्टोबर ते जानेवारी दरम्यान १३ ते १५ लिटर पाणी प्रती झाड आणि फेब्रुवारी ते पावसाळा सुरु होईपर्यंत १९ ते २२.६ लिटर पाणी प्रती झाड (एकूण १३५.३ हेक्टर सेमी) देण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१५** |
| खत व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | केळीच्या कोकण सफेद वेलची या जातीची उती संवर्धनाने अभिवृध्दी करण्यासाठी क्रमाने कार्बेन्डॅझिम १ टक्के, इथेनॉल ७० टक्के, सोडीयम हायपोक्लोराईड ५ टक्के आणि सिफोटॅक्सीम २५० मिग्रॅ. प्रती लिटर यांची मात्रा अनुक्रमे ३०, १, १० अणि ३० मिनीटे कालावधीसाठी दिल्यास निर्जंतुक संवर्धक तयार होते. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१६** |
| पाणी व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | कोकण विभागातील जांभ्या जमिनीमध्ये केळी पिकाच्या सफेद वेलची या जातीपासून अधिक उत्पन्न आणि नफा मिळविण्यासाठी सुक्ष्म सिंचन फवारा पध्दतीने दिवसाआड ऑक्टोबर ते जानेवारी दरम्यान १३ ते १५ लिटर पाणी प्रती झाड आणि फेब्रुवारी ते नियतमोसमी पाऊस सुरु होईपर्यंत १८ ते २१ लिटर पाणी प्रती झाड द्यावे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१७** |
| इतर | : | कृषि अर्थशास्त्र :<br>दक्षिण कोकणात केळीचे स्थानिक वाणांचे लाभ-व्यय गुणोत्तर २.१४ ते ३.९६ आणि सुधारीत वाणाचे लाभ-व्यय गुणोत्तर २.६१ आढळुन आले म्हणून केळीची उत्पादकता वाढ आणि अधिक मशागतीचे आधुनिक तंत्रज्ञान व्यवस्थापनाचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे देण्याची |

| | | |
|---|---|---|
| | | शिफारस करण्यात येते. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१८** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | १. नारळ बागेत अधिक उत्पादन व नफा मिळवण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे दालचिनी, जायफळ, काळीमीरी, केळी आणि अननस या पिकांची आंतरपिक म्हणून लागवड करण्याची शिफारस करण्यात येते.<br>२. दक्षिण कोकण विभागात तेल ताडाच्या बागेत सुरुवातीच्या कालावधीत (५ वर्षापर्यंतत) किफायतशीर उत्पन्नाकरिता केळी, अननस आणि सुरण या पिकांची मिश्रपिक म्हणून लागवड करण्याची शिफारस करण्यात येते. |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ विकसित उतीसंवर्धन तंत्र कोकणातील लाल केळीच्या सुक्ष्म अभिवृध्दीसाठी शिफारस करण्यात येत आहे. |